दिनांक : १७/०८/२०२६

# निविदा सूचना

संस्थेच्या नायगाव प्रक्षेत्रावरील चार बंधाऱ्यांमध्ये पाच वर्षे भाडेतत्वावर उक्त्या स्वरूपात मत्स्यपालन करण्यासाठी अनुभवी ठेकेदारांकडून निविदा मागवण्यात येत आहेत.

| अ.क्र. | तपशील | निविदा फार्म फी (Tender Form Fees) | इसारा रक्कम (EMD) |
|---|---|---|---|
| १ | संस्थेच्या नायगाव प्रक्षेत्रावरील चार बंधाऱ्यांमध्ये (अंदाजीत क्षमता २७.१४ कोटी लिटर) पाच वर्षे भाडेतत्वावर उक्त्या स्वरूपात मत्स्यपालन करणे | रू. ५००/- + जीएसटी | रू. ५,०००/- |

टेंडर जमा करण्याची शेवटची तारीख दि. २७/०८/२०२६ राहील. अधिक माहितीसाठी संस्थेचे संकेतस्थळ www.vsisugar.com ला भेट द्यावी. टेंडर स्विकारणे अगर नाकारण्याचा संपूर्ण अधिकार इन्स्टिट्यूटने राखून ठेवलेला आहे.

**महासंचालक**
**व्ही.एस.आय., पुणे**

वसंतदादा शुगर इन्टिटयूट, पुणे                                        टेंडर फॉर्म फी.:

तर्फे

१. नांव
२. पूर्ण पत्ता
३. मोबाईल क्रमांक
४. पॅन क्रमांक
५. सर्व्हिस टॅक्स क्रमांक
६. आधार कार्ड नं.

...........................................................................................................................

दिनांक :

प्रति,
मा.महासंचालक
वसंतदादा शुगर इन्स्टिटयूट
मांजरी बु., ता.हवेली, जि.पुणे ४१२ ३०७

मा.महोदय,

आपल्या दिनांक .......................... रोजीच्या जाहिरातीस अनुसरून संस्थेच्या नायगाव प्रक्षेत्रावरील चार बंधाऱ्यांमध्ये पाच वर्षे भाडेतत्वावर उक्त्या स्वरूपात मत्स्यपालन करण्यासंदर्भातील टेंडर फॉर्म सोबत असलेल्या सर्व नियम व अटी मला/आम्हाला मान्य आहेत.

| अ.क्र. | उत्पादनाचे नाव | एकूण रक्कम रू. (पहिले वर्ष) |
|---|---|---|
| १ | संस्थेच्या नायगाव प्रक्षेत्रावरील चार बंधाऱ्यांमध्ये पाच वर्षे भाडेतत्वावर उक्त्या स्वरूपात मत्स्यपालन करणे | |

सोबत बयाणा रक्कम रू.५,०००/- डि.डि.क्रमांक.................. दि. ............... बँक.......................... जोडला आहे.

कळावे,

आपला विश्वासू,

ठिकाण :                                        सही :

दिनांक :                                        संपूर्ण नांव :

## अटी व शर्ती

१. वार्षिक उक्त्या स्वरूपातील मत्स्यपालनाचा करार पुढील पाच वर्षासाठी अंमलात राहील. कराराचा कालावधी दर वर्षीच्या ०१ एप्रिल ते ३१ मार्च असा असून दि. ०१/०४/२०२६ ते दि. ३१/०३/२०२७ च्या कराराची रक्कम रू................./- (अक्षरी रू.------------------------------------फक्त) इतकी असून, सुरक्षा ठेव रक्कम रू. ५०,०००/- इतकी राहील.

२. सदरील कराराउपरांत दरवर्षी संबंधित ठेकेदाराने उक्त्या स्वरूपातील मत्स्यपालनाच्या एकूण रक्कमेत १५% वार्षिक दरवाढ पुढील पाच वर्षांसाठी कार्यान्वित/अंमलात राहून, संबंधित ठेकेदाराने दर वर्षी १००% ॲडव्हान्स रक्कम त्वरित जमा करणे बंधनकारक राहील.

३. सदरील करारासाठी संबंधित ठेकेदाराने रू.५००/- चे मुद्रांक सोबत जमा करणे आवश्यक आहे.

४. संबंधित ठेकेदाराने स्व:खर्चाने वार्षिक उक्त्या स्वरूपातील मत्स्यपालन बंधाऱ्यांच्या बांधावरील व आतिल तण व्यवस्थापन/जलपर्णी/प्लास्टिक/काडीकचरा साफसफाई इ. करणे आवश्यक राहील. तसेच सदरच्या बंधाऱ्यात फक्त मत्स्यपालन करावे, खेकडा पालन करण्यास पूर्णतः मनाई राहील.

५. संबंधित ठेकेदाराने स्व:खर्चाने वार्षिक उक्त्या स्वरूपातील मत्स्यपालनाचे व त्याअनुषंगाने कीड/रोगव्यवस्थापन व मुख्य/सुक्ष्म अन्नद्रव्ये व्यवस्थापन इ. कामे करणे आवश्यक राहील.

६. संबंधित ठेकेदाराने स्व:खर्चाने वार्षिक उक्त्या स्वरूपातील मत्स्यपालनाची सर्व प्रकारची देखरेख व मेंटेनन्स करणे आवश्यक राहील.

७. संबंधित ठेकेदाराने वार्षिक उक्त्या स्वरूपातील मत्स्यपालन बंधाऱ्यांचे कोणत्याही प्रकारचे नुकसान तसेच प्रक्षेत्रावरील इतर मालमत्तांचे कोणत्याही प्रकारचे नुकसान करता कामा नये. कोणतेही नुकसान झाल्यास त्याची योग्य ती नुकसान भरपाई संस्था ठरवेल त्याप्रमाणे बंधनकारक राहील. त्यासंदर्भात मा. महासंचालक सो। यांचा निर्णय अंतिम राहील.

८. संबंधित ठेकेदाराने वार्षिक उक्त्या स्वरूपातील मत्स्यपालन संदर्भातील वेळोवेळी घालून दिलेल्या लेखी/तोंडी अटी शर्तींच्या अधिन राहून त्यांचे पालन करणे आवश्यक राहील.

९. कोणत्याही अटी शर्तींचे उल्लंघन झाल्यास संस्थेमार्फत योग्य ती कारवाई करण्यात येईल. अथवा कोणतीही पूर्व सुचना न देता सदरील करार संस्थेमार्फत रद्य करण्यात येईल.

१०. सदरील कराराउपरांत जर पुढील पाच वर्षात उद्‌भवलेल्या भौतिक व नैसर्गिक अडचणींमुळे तसेच तांत्रिकदृष्टया अकार्यक्षमतेमुळे ठेकेदार अयशस्वी झाल्यास त्याची पूर्ण जबाबदारी ही संबंधित ठेकेदाराचीच असल्याने त्यांना कोणत्याही परिस्थितीत कराराच्या अनुषंगाने १५% वार्षिक दरवाढी नुसार पुढील पाच वर्षांची संपूर्ण देय रक्कम देणे बंधनकारक राहील.

११. कोणत्याही नैसर्गिक तसेच भौतिक आपत्तींसाठी/अडचणींसाठी संस्था जबाबदार राहणार नाही. तसेच चोरींच्या घटना/नुकसानीसाठीही संस्था जबाबदार राहणार नाही.

१२. संस्थेमार्फत संबंधित ठेकेदारास कॅनल-उपसासिंचनच्या माध्यमातून उपलब्धेनुसारच फक्त पाण्याची उपलब्धता करण्यात येईल.